# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-2557266/46 कार्यासन दु. क्र. 0712-2557266

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

**तात्काळ**

क्र.तशिस/विकाना/शैवि-1/सफलता/2019/ 3433

दिनांक:- 18 NOV 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एच.एच.सी.टी/एमबीए/एमसीए,
पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था, नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2019-20 मधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशीत विद्यार्थ्यांची छाननी/पडताळणी सफलता पोर्टलवर करण्याबाबत.

संदर्भ:- प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. प्रनिप्रा/प्र.क्र. 66/नोंदणी प्रक्रिया/2019/987, दि. 31/10/2019

शैक्षणिक वर्ष 2019-20 मधील प्रवेश मान्यतेची प्रक्रिया ही प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या "सफलता" या पोर्टलवर संगणिकृत प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबतचे वेळापत्रक संदर्भिय पत्रात दिलेले आहे. सदरहू संदर्भिय पत्र सोबत जोडलेले आहे.

त्यानुसार आपण आपल्या संस्थेचे रजिस्ट्रेशन "सफलता" या पोर्टलवर करण्याबाबत याआगोदरच आपणास सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार "सफलता" या पोर्टलवर रजिस्ट्रेशन करून खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

1. शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये आपल्या संस्थेत प्रवेशीत विद्यार्थांची यादी "सफलता" पोर्टलवर आपल्या संस्थेच्या लॉगिन आयडी मध्ये देण्यात आलेली आहे.
2. प्रवेशीत विद्यार्थांची यादीसोबत त्यांनी प्रवेशाच्या वेळी अपलोड केलेली प्रमाणपत्रे सुध्दा उपलब्ध आहेत. सदरहू अपलोड केलेली प्रत्येक विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे आपण आपल्या स्तरावर तपासणी करून प्रमाणपत्रे यादीनुसारच अपलोड केले आहेत किंवा नाही याबाबत शहनिशा करावी.
3. प्रमाणपत्रे चुकीचे किंवा कोरे अपलोड केल्याचे लक्षात आल्यास प्रमाणपत्र परत अपलोड केल्याची सुविधा "सफलता" पोर्टलवर आपल्या लॉगिनमध्ये देण्यात आलेली आहे. त्यानुसार योग्य ते प्रमाणपत्रे अपलोड करण्यात यावे. परंतू अपलोड करतेवेळी ते प्रमाणपत्रे प्रवेशाकरीता ठरवून दिलेल्या विहित मुदतीतचे निर्गमित झाले असल्याची खात्री करूनच अपलोड करावी.
4. या कार्यालयाव्दारे आपल्या संस्थेच्या गुणवत्ता यादया ऑफलाईन पध्दतीने तपासणी पुर्ण करण्यात आलेली आहे. तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटयांचे निराकरण ज्या संस्थेने अद्यापपर्यंत केलेले नाही त्यांनी तात्काळ त्रुटयांचे निराकरण या कार्यालयातील नियुक्त चमुकडून पुर्ण करून घ्यावे.
5. ज्या संस्थेच्या गुणवत्ता यादयांची तपासणी पुर्ण होऊन कुठलीही त्रुटी शिल्लक नसल्यास त्यांनी "सफलता" पोर्टलवरील विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्राची तपासणी पुर्ण झालेली आहे व प्रमाणपत्रे बरोबर अपलोड केलेली आहेत अश्या आशयावे हमीपत्र प्राचार्य/संचालक यांचे स्वाक्षरी, नाव व शिक्यासह या कार्यालयाकडे संस्थेच्या लेटरहेड वर सादर करावे.

6. चुकीचे प्रमाणपत्र अपलोड करून हमीपत्र सादर केल्याचे लक्षात आल्यास अश्या संस्थेविरुध्द प्रवेश व शुल्काचे अधिनियम, 2015 नुसार कार्यवाही करण्यात येईल याबाबत संबंधीत संस्थेने नोंद घ्यावी.
7. प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी काही कारणास्तव एखादया विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केला असल्यास अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची सुविधा संस्थेच्या Login-ID मध्ये दिलेली आहे. तसेच Cancellation Admission Restore करण्याची सुध्दा सुविधा संस्था Login मध्ये दिलेली आहे.

प्रवेश मान्यतेची प्रक्रिया ही प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या "सफलता" या पोर्टलवर विहीत मुदतीत पुर्ण करावयाची असल्याने प्रमाणपत्रे बरोबर अपलोड केलेली आहेत अश्या आशयाचे **हमीपत्र** तात्काळ या कार्यालयाकडे सादर करावे, जेणेकरून या कार्यालयामार्फत प्रवेश मान्यतेची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करणे शक्य होईल.

**सहपत्र**:- संदर्भिय पत्र

(डॉ. राम निबुदे)
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

C:\Users\Admin\Desktop\Merit List 2019-20\Letter & Office Order.doc